# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. १३ जून २०२४

मा. पोलीस आयुक्त श्री.एम.राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली बकरी ईद उत्सव चे अनुषंगाने सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दि. १३/०६/२०२४ रोजी ११.०० वा. पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी, शांतता समिती सदस्य, सोलापूर महानगर पालिकेकडील अधिकारी, शहर काझी, मुस्लीम धर्मगुरु, शहरातील प्रमुख मस्जिदचे विश्वस्थ, शहारातील प्रमुख ईदगाह मैदान यांचे विश्वस्थ यांची पोलीस आयुक्त कार्यालय येथे संयुक्तपणे बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीची प्रस्तावना श्रीमती डॉ. दिपाली काळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी करुन बैठक आयोजन करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला.

बकरी ईद पार्श्वभुमीवर कोणीही, कोणत्याही प्रकारे गोवंशीय प्राण्यांची अवैधपणे वाहतूक करणार नाही याची नोंद घ्यावी, बकरी ईदच्या पार्श्वभुमीवर कोणीही कोणत्याही प्रकारे गोवंशीय प्राण्यांची अवेधपणे कुर्बानी देणार नाही याची सक्त नोंद घ्यावी. गोवंशीय प्राण्यांची अवैधपणे वाहतूक निदर्शनास आल्यास स्थानिक पोलीसांशी किंवा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. कोणतीही खाजगी व्यक्ती अथवा कोणत्याही संघटनांचे कार्यकर्ते यांनी गोवंशीय जनावरांची वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यास स्वत: अवैधपणे वाहन अडविणार नाहीत. कुर्बानी नंतर सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर किंवा उघडयावर कोणतीही घाण, रक्त किंवा मांस पडणार नाही याची दक्षता घ्यावी. स्वच्छतेचे पालन करुन रोगराई, दुर्गंधी पसरणार नाही याची दक्षता घ्यावी. नागरीकांनी कोणत्याही स्थितीत चुकीच्या अफवांवर विश्वास न ठेवता सामंजस्याने वागावे. सोशल मिडीयाव्दारे कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, व्हिडीओ फॉरवर्ड न करता ते डिलीट करुन जातीय सलोखा अबाधित राखावा. एखादी अप्रिय अथवा चुकीची घटना आजूबाजूला घडत असल्यास स्थानिक पोलीस ठाणे किंवा नियंत्रण कक्ष येथे त्वरीत माहिती द्यावी. कोणत्याही धार्मिक स्थळी आक्षेपार्ह भाष्य/वक्तव्य केले जाणार नाही याची संबंधितांनी खबरदारी घ्यावी. बकरी ईदच्या अनुषंगाने नमाजाचेवेळी प्रत्येक ईदगाह येथे आवश्यकतेनुसार जबाबदार स्वयंसेवक नेमावेत. उपरोक्त सुचनांचे पालन करुन कायदा व सुव्यवस्था राखणेकामी सर्वांनी सहकार्य करावे.

त्यानंतर बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी समस्या/सुचना मांडल्या. त्यानंतर सदर सुचनेचे संबंधित महानगर पालिका अधिकारी यांनी सदर कामाची रुपरेषा बघुन समस्या सोडविण्यात येतील असे सांगितले.

मा. पोलीस आयुक्त सो यांनी बैठकीस उपस्थित लोकांचे स्वागत करुन मांडलेल्या अडी-अडचणीचे निरसण केले. उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा, शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परीसरातील बेकायेदशीर बाबींची माहिती पोलीसांना दिली पाहिजे. नियमांचे पालन करावे, योग्य बदोबस्त नेमु असे सांगुन बकरी ईद निमित्त शुभेच्छा देवून बैठकीला उपस्थितांचे आभार मानले.

सदर बैठकीस, मा. पोलीस आयुक्त श्री. एम.राजकुमार,मा. श्री. अजित बोऱ्हाडे, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मा. श्रीमती डॉ. दिपाली काळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. विजय कबाडे, पोलीस उप आयुक्त (परीमंडळ), श्री अशोक तोरडमल सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-१, श्री. अजय परमार, विभाग-२, श्री. यशंवत गवारी, वाहतुक शाखा, श्रीमती. प्रांजली सोनवणे, गुन्हे शाखा, तसेच सोलापूर महानगर पालिकेकडील अधिकारी श्री मठपती, महावितरण अति.कार्यकारी अभियंता श्री. प्रदिप मोरे, व सहा आयुक्त पशुसवंर्धन अधिकारी श्री विशाल येवले,सोमपा पशु चिकित्सक श्री शिंदे भरत तसेच सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार, व शांतता कमिटीचे सदस्य, व पत्रकार बंधु उपस्थित होते.

तरी उपरोक्त प्रमाणे शांतता समिती सदस्य यांचे समवेत घेण्यात आलेल्या बैठकीतील ठळक मुद्यांबाबत आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दी करुन पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.